महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय , अवसरी खुर्द

## तालुका – आंबेगाव, जिल्हा – पुणे - ४१२४०५

दूरध्वनी क्र. : ०२१३३-२३०५८२ संकेतस्थळ : www.gcoeara.ac.in

ईमेल: office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in

(स्वयंचल व यंत्र अभियांत्रिकी अभ्यासक्रम एनबीए, नवी दिल्ली मानांकित)

जा.क्र. शाअवसंमअ/विवि/२०२४/286 दि. 25 JAN 2024

## अनुसूचित जाती (SC) विद्यार्थ्यांसाठी विशेष सुचना-

विषय - शै. व. २०२१-२२ पासून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती दुसरा हप्ता थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाल्याने महाविद्यालयास देय असणारी रक्कम महाविद्यालयात जमा करणेबाबत .

संदर्भ - १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र: भासशी- २०२२/प्र.क्र.७४/शिक्षण-१, दि.१७/०३/२०२२

२) जा.क्र.सआसकपुणे/भासशि/शिष्यवृत्ती/केंद्र हिस्सा-६०%/२०२३-२४/२८३ दि. १२/०१/२०२४

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने अनुसूचित जाती प्रवर्गातून प्रवेशित ज्या विदयार्थ्यांनी शै.व. २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये **SC Post Matric** शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर केले होते व शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे अशा सर्व विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, शै. व. २०२१-२२ पासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र: भासशी- २०२२/प्र.क्र.७४/शिक्षण-१, दि.१७/०३/२०२२ नुसार अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील शिष्यवृत्तीचा पहिला हप्ता (४०%) प्रमाणे रुपये-९४००/- महाविद्यालयाच्या खात्यामध्ये जमा झालेले आहेत. शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता (६०%) प्रमाणे रुपये १४१००/- महाविद्यालयाच्या बँक खात्यामध्ये जमा न होता थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होत आहेत. तरी अनुसूचित जाती प्रवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता (६०%) प्रमाणे विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यानंतर महाविद्यालयास देय असलेली **रक्कम रुपये- १४१००/- पुढील सात दिवसांच्या आत महाविद्यालयाच्या बँक खात्यामध्ये SBI Collect द्वारे SC SCHOLARSHIP RECOVERY या हेड अंतर्गत जमा करणे बंधनकारक आहे** तसेच सदर रक्कम जमा केलेची SBI Collect ची दोन प्रिंट काढून एक कॉपी रोखपाल यांचेकडे व एक कॉपी विद्यार्थी विभागातील श्रीम.होनावळे क.लिपिक यांचेकडे जमा करावी. तसेच जे विद्यार्थी महाविद्यालयास देय असलेली रक्कम जमा करणार नाहीत त्यांच्यावर शासन नियमानुसार उचित कारवाई करण्यात येईल याची संबधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

25-1-24

(डॉ.डी.आर.पानगव्हाणे)

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय

अवसरी खुर्द, ता.आंबेगाव जि.पुणे.

प्रत - १. विभागप्रमुख- स्वंयचल/अणुविदयुत/उपकरणीकरण/यंत्र/स्थापत्य/संगणक/उपयोजित विज्ञान/कर्मशाळा - त्यांनी या आदेशाची प्रत विभागीय सुचना फलकावर लावावी.

२. सर्वसाधारण सूचना फलक

३. डीपीयु विभाग यांनी सर्व विभागप्रमुखांना मेलद्वारे कळवावे.

४. श्रीमती. पी. व्ही. कुलकर्णी सहाय्यक प्राध्यापक, संगणक विभाग यांना विभागप्रमुखांमार्फत महाविदयालयीन संकेतस्थळावर प्रदर्शित करणेकरीता.